Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

तरसोद बोगद्यातील पाणी साचण्याच्या समस्येवर १५ दिवसांची डेडलाईन!

(पान २ वर)



। रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १५५ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

पेपरफुटी रोखण्यासाठी राज्यात नवे सूत्र

पुणे : प्रश्नपत्रिकाच नसल्या, तर पेपरफुटीचा धोकाही राहणार नाही. त्यामुळे आयत्या वेळी प्रश्नपत्रिका निर्माण करण्याचे सूत्र निश्चित करण्यात आल्याचे राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठीत उच्चस्तरीय कृती समितीच्या (टास्क फोर्स) अध्यक्ष आणि सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले.'प्रश्नपत्रिकांची निर्मिती, छापाई, वितरण आदी टप्प्यांवर गळतीचे धोके असतात. त्यामुळे ही साखळी संपुष्टात आणून कोणलाही प्रश्नापत्रिकांची माहिती होऊ शकणार नाही,' अशी व्यवस्था उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. भरती परिक्षांबाबतच्या सूचना, तक्रारी जाणून घेण्यासाठी पुण्यात आयोजित पहिल्या विद्यार्थी संवाद-सल्लामसलत सत्रानंतर समितीच्या सदस्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

१९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर उपोषणाचा निर्धार, १५ सप्टेंबरपासून अंतरवाली सराटीतून मुंबईकडे प्रस्थान

मनोज जरांगे पाटील मुंबईकडे कूच करणार!

हडपसर आणि खोपोली येथे मुक्काम ; महाजन यांचे आंदोलनाची वेळ बदलण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

मुंबई/जालना। मराठा आरक्षणाच्या मागणीवरून आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाचा आज १५ वा दिवस असून, आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी अंतरवाली सराटी येथे मराठा बांधवांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत जरांगे पाटील यांनी मुंबईतील आंदोलनाची घोषणा करत १५ सप्टेंबरपासून अंतरवाली सराटी ते मुंबई असा प्रवास करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

जरांगे पाटील यांच्या नियोजित आंदोलनानुसार, १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे प्रस्थान करण्यात येणार असून, पहिला मुक्काम बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे असणार आहे.त्यानंतर १६ सप्टेंबरला अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, १७ सप्टेंबरला पुण्यातील हडपसर आणि १८ सप्टेंबरला रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे मुक्काम करण्यात येणार आहे. त्यानंतर १९ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करण्याचा निर्धार जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत होणाऱ्या या आंदोलनामुळे सरकारसमोर पुन्हा एकदा मोठे आव्हान निर्माण होण्याची शक्यता



आहे. दरम्यान, या आंदोलनाबाबत मंत्री गिरीश महाजन यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याशी सरकारचे बोलणे सुरू असून, आरक्षणाच्या प्रश्नावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे गिरीश महाजन यांनी सांगितले. मात्र, गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत आंदोलन करणे योग्य ठरणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. "गणेशोत्सव हा आपला मोठा उत्सव आहे. या काळात मुंबईमध्ये मोठी गर्दी होते. महिला, मुले आणि नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर असतात. त्यामुळे आंदोलनाची ही वेळ त्यांनी टाळली पाहिजे," असे महाजन यांनी म्हटले. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आंदोलन, उपोषण आणि मोर्चा काढण्याचा अधिकार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, त्याचवेळी नागरिकांना त्रास होणार नाही आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे जरांगे पाटील यांनी आपल्या निर्णयाचा पुन्हा विचार करावा, असे आवाहन महाजन यांनी केले. दरम्यान, मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परवानगीचा मुद्दाही महत्त्वाचा ठरणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने आंदोलनासाठी आवश्यक परवानगी घेण्याबाबत निर्देश दिल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याचे समोर आले आहे.जरांगे पाटील यांच्या नियोजित आंदोलनानुसार, १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे प्रस्थान करण्यात येणार असून, पहिला मुक्काम बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे असणार आहे.

परवानगीचा मुद्दा ऐरणीवर

आता सरकार आणि प्रशासन मुंबईतील या आंदोलनाला परवानगी देणार का? जरांगे पाटील आपल्या नियोजित मार्गावरून मुंबईकडे कूच करणार का? तसेच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून कोणती पावले उचलली जाणार, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर जरांगे पाटील आपल्या भूमिकेवर ठाम असून, सरकारकडून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत सरकार आणि जरांगे पाटील यांच्यातील चर्चेला काय वळण मिळते, यावर मुंबईतील आंदोलनाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

कृषी विभागाचा आकृतीबंध अखेर रद्द; कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची घोषणा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: तब्बल १७ वर्षानंतर तयार करण्यात आलेला कृषी विभागाचा आकृतीबंध अधिकारी आणि कर्मचारी संघटनेच्या प्रखर विरोधानंतर रद्द करण्यात आला. पुढील मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या संमतीने मंजूर झालेला आकृतीबंध अधिकृतपणे रद्द करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मंजूर झालेला आकृतीबंध तांत्रिक प्रवर्गावर अन्याय करणारा, शेतीच्या बांधावरील मनुष्यबळ कमी करून आस्थापना शाखेला बळ देणारा, आस्थापना शाखेला अतिरिक्त मनुष्यबळ पुरवणारा असल्याचा आरोप करून महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने आकृतीबंधाला कडाडून विरोध केला होता. आकृतीबंधाच्या विरोधात पुण्यात धरणे आंदोलन, उपोषण उपोषण सुरू होते. मागील मंगळवारी मंत्रालयात आकृतीबंध संबंधित सर्व कर्मचारी संघटनांची बैठक घेण्यात आली. पण कर्मचाऱ्यांच्या बैठकीत मागण्यांवर एकमत होऊ शकले नाही, तसेच कर्मचाऱ्यांच्या मागण्यांमध्ये एक वाक्यता नसल्यामुळे आणि मागण्या एकमेकांच्या विरोधात गेल्यामुळे बैठक निष्फळ ठरली होती. त्यामुळे प्रस्तावित आकृतीबंध रद्द करण्यात यावा. अतांत्रिक आकृतीबंध तयार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि आकृतीबंध नव्याने तयार करण्यासाठी सर्वसमावेशक समिती निर्माण करण्यात यावी, अशी मागणी महासंघाने केले होती. या सर्व घडामोडीच्या पार्श्वभूमीवर महासंघाच्या मागणीचा विचार करून कृषिमंत्र्यांनी आकृतीबंध



रद्द केल्याची घोषणा केली आहे. मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या संमतीने आकृतीबंध अधिकृतपणे रद्द केला जाईल, असेही भरणे यांनी म्हटले आहे. आकृतीबंध रद्द केल्याच्या घोषणामुळे महिन्याभरापासून आकृतीबंधावरून सुरू असलेले आरोप प्रत्यारोप शांत झाले आहेत. ऑगस्ट महिन्यात मंत्रिमंडळ बैठकीत कृषी विभागाच्या २३ हजार ४७६ पदांच्या आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली होती. १७ वर्षांनी तयार करण्यात आलेल्या या आकृतीबंधमध्ये सहा हजारांवर पदे रद्द करण्यात आली होती. त्यामुळे ९२ कोटी साठ लाख रुपये बचत होणार होती. नव्या आकृतीबंधामध्ये कृषी संचालकांची १०, कृषी सहसंचालकांची १९,अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांची ११५, कृषी उपसंचालकांची ३२४, तालुका कृषी अधिकारी तथा तंत्र अधिकारी यांची ८४९, कृषी अधिकारी गट ब २०१७, अधिकारी दर्जाची ३४३ पदे तर सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांची १२ हजार ९०५ पदे निर्माण करण्यात आली होती. यामध्ये सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांची पदे खातेदारांच्या संख्येवर निश्चित करण्यात आली होती. मात्र, त्याला लोकप्रतिनिधींसह कृषी विभागातून विरोध करण्यात आला. त्यामुळे पुढील मंत्रिमंडळ बैठकीत ही पदे क्षेत्रफळावर आधारित निश्चित करण्यात आली. त्यामुळे सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांची १३०६ व उप कृषी अधिकाऱ्यांची ६८२ पदे वाढविण्यात आली होती.कृषी विभागाचा विस्तार मोठा आहे. त्यामुळे बदलत्या काळानुसार कामकाज करण्यासाठी आकृतीबंध तयार करण्यात आला होता. मात्र टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या मागण्या समोर येत आहेत. आम्ही समजूत काढूनही त्यातून मार्ग निघत नाही. त्यामुळे माझ्या विभागाचे अधिकारी कर्मचारी जर सहमत नसतील तर आकृतीबंध त्यांच्यावर लादणार नाही. पुढील मंत्रिमंडळ बैठकीत आकृतीबंध रद्द करावा, अशी मागणी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहे.

शिक्षकेतर भरती, वैयक्तिक मान्यतांबाबत नवा निर्णय, काय होणार?

जन सम्राट टाईम्स

मुंबई |प्रतिनिधी: खासगी अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर पदांच्या भरतीप्रक्रियेला आता ऑनलाइन स्वरूप देण्यात आले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देण्यासाठी स्वतंत्र शिक्षकेतर वैयक्तिक मान्यता संकेतस्थळ तयार करण्यात आले असून, या संकेतस्थळाद्वारेच नियुक्त्यांना वैयक्तिक मान्यता आणि शालार्थसंबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या ११ ऑगस्ट २०२६च्या निर्णयानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागांवर भरती प्रक्रिया राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यात कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहायक या संवर्गातील पदे सरळसेवेने भरता येणार आहेत. भरती प्रक्रियेपूर्वी पदोन्नती आणि अनुकंपा नियुक्ती करून उर्वरित रिक्त राहिलेल्या पदांवर संचमान्यतेनुसार निश्चित रिक्त पदांच्या ८० टक्के पदे सरळसेवेने भरता येणार आहेत. या सरळसेवा भरतीसाठी संस्थांनी अद्ययावत बिंदूनामावली तपासून घेणे, जाहिरातीचे प्रारूप तयार करून संबंधित शिक्षणाधिकारी किंवा विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. जाहिरात स्थानिक, राज्यस्तरीय वृत्तपत्रांसह संस्थेच्या संकेतस्थळावर आणि शाळेच्या सूचनाफलकावर प्रसिद्ध करावी लागणार आहे. अर्ज, छाननी, मुलाखत आणि अंतिम निवडीसाठी किमान तीन महिन्यांचा कालावधी देणे बंधनकारक आहे. खुल्या प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८, तर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे राहणार आहे. नियुक्तीचा सुरुवातीचा तीन वर्षांचा कालावधी मानधनावर असेल.

राज्यात प्रथम अहिल्यानगर ग्राहक आयोगात आभासी पद्धतीने सुनावणी

जन सम्राट टाईम्स

अहिल्यानगर । प्रतिनिधी: वाढत्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी ग्राहक आयोगानेही आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी घेण्याची प्रक्रिया सुरू केली असून राज्यात सर्वात प्रथम ही सुविधा अहिल्यानगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये सुरू करण्यात आली. या आभासी पद्धतीच्या सुनावणी सेवेची सुरुवात राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष मुकेश शर्मा (मुंबई) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी राज्यातील १० जिल्ह्यात, पहिल्या टप्प्यात ही सुविधा निर्माण केली जाणार असल्याची माहिती दिली. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष मुकेश शर्मा यांनी प्रत्यक्ष आभासी सुनावणी घेऊन या सेवेची सुरुवात केली. यावेळी त्यांनी 'व्हिडिओ कॉन्फरन्स' यंत्रणेतील बारकावे तपासले व सुविधेमध्ये आणखी योग्यता आणण्यासाठी आवश्यक सूचना केल्या तसेच उपस्थित वकिलांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व प्रश्न समजावून घेतले. यावेळी राज्य ग्राहक आयोगाच्या सदस्य पूनम महर्षी, जिल्हा आयोगाचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद, सदस्य चारू डोंगरे, संध्या कसबे, निबंधक कविता कोमार, ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे अध्यक्ष सुनील मुंदडा तसेच वकील व ग्राहक उपस्थित होते.



यावेळी बोलताना मुकेश शर्मा म्हणाले, आभासी पद्धतीच्या नियोजनासाठी अहिल्यानगर जिल्हा आयोगाने स्वतःहून पुढाकार घेतला. मुंबई खंडपीठाप्रमाणेच याचा 'सेटअप' करण्यात आल्याचे त्यांनी कौतुक केले. राज्य आयोगाच्या सदस्य पुनम महर्षी म्हणाल्या, न्यायव्यवस्था खेडेपाड्यापर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. त्यातून न्यायप्रक्रियेत गती मिळणार आहे. चारू डोंगरे म्हणाल्या, ज्येष्ठ वकील व पक्षकारांना सुनावणीसाठी लांब अंतरावरून येणे शक्य होत नाही. यासाठी जिल्हा आयोगाचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद यांनी पुढाकार घेऊन आभासी सुनावणी सुरू करण्यात योगदान दिले. त्याचा लाभ ग्रामीण भागाला होणार आहे. वकील संघाचे अध्यक्ष सुनील मुंदडा म्हणाले, कमी खर्चात जलद स्वरूपात ग्राहकांना न्याय देण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.यावेळी जेष्ठ वकिलांचा सत्कार करण्यात आला. शहर वकील संघटनेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब घुले, सेंट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष फारुख शेख, सचिव अभिजीत देशपांडे, कौटुंबिक न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष शिवाजी कराळे, ज्येष्ठ वकील सुरेश लगड, विद्या तांबोळी, अशोक बंग, शिरीष जोशी, शिरीष गटने, किशोर राऊत, योगेश कुलकर्णी, अरुणा राशिनकर, सुजाता कुमार, शुभ्रा तांबोळी तसेच वकील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. शुभांगी बाबर यांनी सूत्रसंचालन केले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर तुकाराम मुंढेंची राज्यभरात धाड

दोन दिवसांत ४.४५ कोटींचा भेसळयुक्त खवा, बटर आणि पनीर जप्त!

जन सम्राट टाईम्स

पुणे| प्रतिनिधी: गणेशोत्सव आणि आगामी सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (FDA) आक्रमक मोहीम उघडली आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या राज्यव्यापी कारवाईत अवघ्या दोन दिवसांत ४ कोटी ४५ लाख रुपये किमतीचा संशयास्पद व भेसळयुक्त अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि बुलढाणा येथे टाकलेल्या धाडींमुळे भेसळदार अन्नाचा व्यापार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.अहिल्यानगरमधील एमआयडीसी भागातील 'अरिहंत कोल्ड स्टोरेज'वर एफडीएच्या पथकाने अचानक धाड टाकली. या कारवाईत हलक्या दर्जाचे आणि लेबलच्या नियमांचे उल्लंघन केलेले तब्बल ७५ हजार ३५६ किलो 'पाश्चराईज्ड कुकिंग बटर' जप्त करण्यात आले. या जप्त केलेल्या बटरची बाजारातील किंमत ३ कोटी ९५ लाख ६२ हजार ३२० रुपये आहे. या साठ्याचे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठवण्यात आले आहेत.कर्नाटकातून पुण्यात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त पनीर, खवा आणि दही आणले जात असल्याची गुप्त माहिती एफडीएला मिळाली होती. प्रशासनाने लागोपाठ ५ दिवस पाळत ठेवून बुधवार पेठ परिसरात धाड टाकली. गाड्यांची झाडाझडती: 'MH-12 QW-7011' आणि 'MH-12



WX-7011' या दोन वाहनांतून अस्वच्छ, गंजलेल्या आणि विना-तापमान नियंत्रण व्यवस्थेतून पनीर व दह्याची वाहतूक केली जात होती. अनेक पिशव्यांवर उत्पादन तारीख, एक्स्पायरी डेट किंवा 'बॅच नंबर' नव्हता.

खवा नष्ट: बुधवार पेठ येथील 'के. बी. अगरवाल' या पेढीतून ४ हजार ६२७ किलो बिनलेबलचा खवा जप्त करण्यात आला. हा खवा नाशवंत असल्याने हडपसर येथे तात्काळ नष्ट करण्यात आला. पुण्यातून एकूण १८ हजार ७० किलो (किंमत ₹४३.२७ लाख) साठा जप्त करत ६९ नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.गुजरातहून येणारी बर्फी जप्त (नाशिक): गुजरातहून लक्झरी बसमधून अवैधपणे आणली जाणारी २ हजार १५५ किलो 'स्पेशल स्वीट बर्फी' नाशिकच्या द्वारका चौकात जप्त करण्यात आली. ५ लाख ५८ हजार रुपये किमतीचा हा साठा अस्वच्छ वातावरणात आणला जात असल्याने जागीच नष्ट करण्यात आला. विनापरवाना दुग्ध केंद्र (बुलढाणा): नांदुरा तालुक्यातील येरळी येथील 'मराठवऱ्हाड दूध उत्पादक संस्थेच्या' केंद्रावर धाड टाकण्यात आली. विनापरवाना व्यवसाय, अस्वच्छता आणि प्राथमिक चाचण्यांचा अभाव आढळल्याने गाईचे व म्हशीचे संशयास्पद दूध जप्त करून नष्ट करण्यात आले.महाराष्ट्रात अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत आणि कायद्याच्या अंमलबजावणीबाबत शासन अत्यंत कठोर आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. मुदतबाह्य किंवा फेरफार केलेल्या अन्नपदार्थांची विक्री आणि साठवणूक करणाऱ्यांवर अशीच कडक कायदेशीर कारवाई सुरू राहील."गणेशोत्सव आणि आगामी सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (FDA) आक्रमक मोहीम उघडली आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या राज्यव्यापी कारवाईत अवघ्या दोन दिवसांत ४ कोटी ४५ लाख रुपये किमतीचा संशयास्पद व भेसळयुक्त अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि बुलढाणा येथे टाकलेल्या धाडींमुळे भेसळदार अन्नाचा व्यापार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

'लष्कर-ए-तोयबा'शी संबंधित एकास महाबळेश्वरमध्ये अटक

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी: मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील एका अनधिकृत मशिदीच्या पाडकामावेळी या कारवाईस पाठिंबा देणाऱ्या व्यक्तीस धमकी प्रकरणाचा तपास करताना महाबळेश्वर तालुक्यातील पाचगणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एकाचे थेट पाकिस्तानशी संबंध उघडकीस आले आहेत. मोहम्मद शफीक मोहम्मद अकबर लोन (वय ३९, रा. महाबळेश्वर) असे संबंधिताचे नाव असून त्यास मुंबई गुन्हे शाखेच्या गुन्हे गुप्तचर पथकाने शनिवारी अटक केली आहे. त्याचे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना 'लष्कर-ए-तोयबा'शी संबंध असल्याचे पोलिसांनी सांगितले.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील एक अनधिकृत मशीद नुकतीच पाडण्यात आली. या कारवाईस प्रसिद्ध व्यावसायिक इम्तियाज खत्री यांनी पाठिंबा दर्शवला होता. यानंतर खत्री यांना २१ मे पासून आंतरराष्ट्रीय क्रमांकांवरून सातत्याने धमक्या येत होत्या. याबाबत त्यांनी २२ जून रोजी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीचा तपास करताना वरील प्रकार उघडीस आला आहे. पोलिसांच्या या तपासादरम्यान संशयित आरोपी शफीकची अत्यंत संवेदनशील दहशतवादी पार्श्वभूमी समोर आली आहे. त्याचे वडील आणि दोन मोठे भाऊ सध्या पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबाद येथे वास्तव्यास आहेत. त्याचा एक भाऊ २०१९ मध्ये पाकिस्तानात गेला असून, तो 'लष्कर-ए-तोयबा' या प्रतिबंधित दहशतवादी संघटनेत कमांडर पदावर कार्यरत असल्याची माहितीदेखील या तपासात पुढे आली आहे. धमक्यांचे हे दूरध्वनी, संदेश शफीक याच्या मोबाइलमधून येत असल्याचे पुरावेदेखील पोलिसांना मिळाले आहेत.

डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेजच्या विद्यार्थिनींची 'सुप्रीम इंडस्ट्रीज'ला औद्योगिक भेट!

उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, आधुनिक तंत्रज्ञान अन् कॉर्पोरेट कार्यसंस्कृतीची घेतली प्रत्यक्ष माहिती

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थिनींना प्रत्यक्ष औद्योगिक वातावरण, उत्पादन प्रक्रिया आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, या उद्देशाने गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, जळगाव येथील विद्यार्थिनींसाठी गाडेगाव येथील सुप्रीम इंडस्ट्रीज येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीदरम्यान विद्यार्थिनींना उद्योगातील विविध विभागांचे कामकाज जवळून समजून घेण्याची संधी मिळाली. कंपनीतील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. जयदीप सिंग (गुणवत्ता हमी विभाग) यांनी उत्पादनांची गुणवत्ता तपासणी, क्वालिटी कंट्रोल आणि आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मानकांची माहिती दिली. गोपाल पांडे (पीव्हीसी प्रभारी) यांनी पीव्हीसी उत्पादन प्रक्रिया व त्यातील तांत्रिक बाबी समजावून सांगितल्या. सुमित नारखेडे (इंजिनिअरिंग लाईन) यांनी उत्पादन लाईनची रचना, यंत्रसामग्रीचे कार्य आणि विविध इंजिनिअरिंग प्रक्रियांची माहिती दिली. तर धनंजय जोहुरकर (मानव संसाधन) यांनी मानवी संसाधन व्यवस्थापन, कॉर्पोरेट संस्कृती, उद्योगक्षेत्रातील कार्यपद्धती आणि रोजगाराच्या विविध संधींबाबत विद्यार्थिनींशी संवाद साधला. यावेळी सुप्रीमचे वर्क्स डायरेक्टर गिरीराज सक्सेना यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत कॉर्पोरेट क्षेत्रातील अपेक्षा, व्यावसायिक कौशल्ये, शिस्त, कार्यक्षमता आणि भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थिनींना प्रत्यक्ष उद्योगविश्वाचा अनुभव मिळाला. उत्पादन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण, व्यवस्थापन प्रणाली आणि कॉर्पोरेट कार्यसंस्कृती समजून घेण्यास ही भेट उपयुक्त ठरली. अभ्यासक्रमातील संकल्पना प्रत्यक्ष औद्योगिक कामकाजाशी जोडण्याच्या दृष्टीने विद्यार्थिनींसाठी हा अनुभव ज्ञानवर्धक ठरला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. औद्योगिक भेटीचे आयोजन प्रो. मानसी अहिरे यांनी केले. पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थिनींना प्रत्यक्ष औद्योगिक वातावरण, उत्पादन प्रक्रिया आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, या उद्देशाने गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, जळगाव येथील विद्यार्थिनींसाठी गाडेगाव येथील सुप्रीम इंडस्ट्रीज येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीदरम्यान विद्यार्थिनींना उद्योगातील विविध विभागांचे कामकाज जवळून समजून घेण्याची संधी मिळाली. कंपनीतील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. जयदीप सिंग (गुणवत्ता हमी विभाग) यांनी उत्पादनांची गुणवत्ता तपासणी, क्वालिटी कंट्रोल आणि आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मानकांची माहिती दिली. गोपाल पांडे (पीव्हीसी प्रभारी) यांनी पीव्हीसी उत्पादन प्रक्रिया व त्यातील तांत्रिक बाबी समजावून सांगितल्या. सुमित नारखेडे (इंजिनिअरिंग लाईन) यांनी उत्पादन लाईनची रचना, यंत्रसामग्रीचे कार्य आणि विविध इंजिनिअरिंग प्रक्रियांची माहिती दिली. तर धनंजय जोहुरकर (मानव संसाधन) यांनी मानवी संसाधन व्यवस्थापन, कॉर्पोरेट संस्कृती, उद्योगक्षेत्रातील कार्यपद्धती आणि रोजगाराच्या विविध संधींबाबत विद्यार्थिनींशी संवाद साधला. यावेळी सुप्रीमचे वर्क्स डायरेक्टर गिरीराज सक्सेना यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत कॉर्पोरेट क्षेत्रातील अपेक्षा, व्यावसायिक कौशल्ये, शिस्त, कार्यक्षमता आणि भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले.



जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

यात्रेत सापडलेला मौल्यवान मोबाईल प्रामाणिकपणे केला परत!



जन सम्राट टाईम्स

बोदवड,| प्रतिनिधी : नाडगाव येथे श्री भैरवनाथ बाबा यात्रेनिमित्त हजारो भाविकांनी उत्साहात हजेरी लावली होती. यात्रेतील गर्दीत मूळचे शेगाव येथील रहिवासी व एअरटेल कंपनीत कार्यरत असलेले तेजस राजवैद्य यांचा मोबाईल हरवला. दरम्यान, हा मौल्यवान मोबाईल शिवसेना कार्यकर्ते अमोल व्यवहारे यांना सापडला. मोबाईलवर आलेल्या फोनद्वारे राजवैद्य यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांचा मोबाईल हरवल्याचे व्यवहारे यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ स्वतःचा मोबाईल क्रमांक देऊन राजवैद्य यांना आपली ओळख करून दिली. यावेळी अमोल व्यवहारे यांनी, "चंदूभाऊंचा शिवसैनिक म्हणून माझी परिसरात ओळख आहे. परिसरात तुम्ही माहिती घ्या. तुम्ही कालभैरव भक्त आहात, मी पण कालभैरव भक्त आहे.

निश्चिंत राहा. सध्या पावसात येऊ नका; उद्या या आणि तुमचा मोबाईल घेऊन जा," असे सांगत राजवैद्य यांना धीर दिला. त्यानुसार आज दुपारी १२ वाजता तेजस राजवैद्य नाडगाव येथे आले. श्री भैरवनाथ महाराज मंदिरात ट्रस्टच्या सदस्य विमलताई धायडे व गजानन भाऊ पवार यांच्या हस्ते त्यांना मोबाईल सुपूर्द करण्यात आला. यावेळी श्री भैरवनाथ बाबा ट्रस्टच्या वतीने नारळ देऊन तेजस राजवैद्य यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. गर्दीच्या यात्रेत सापडलेला मौल्यवान मोबाईल स्वतःकडे न ठेवता तो त्याच्या मूळ मालकाला परत करून अमोल व्यवहारे यांनी प्रामाणिकपणा, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या कृतीचे उपस्थित भाविक आणि नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. प्रामाणिकपणा आजही जिवंत आहे, याचा प्रत्यय देणारी ही घटना परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे. नाडगाव येथे श्री भैरवनाथ बाबा यात्रेनिमित्त हजारो भाविकांनी उत्साहात हजेरी लावली होती. यात्रेतील गर्दीत मूळचे शेगाव येथील रहिवासी व एअरटेल कंपनीत कार्यरत असलेले तेजस राजवैद्य यांचा मोबाईल हरवला. दरम्यान, हा मौल्यवान मोबाईल शिवसेना कार्यकर्ते अमोल व्यवहारे यांना सापडला. मोबाईलवर आलेल्या फोनद्वारे राजवैद्य यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांचा मोबाईल हरवल्याचे व्यवहारे यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ स्वतःचा मोबाईल क्रमांक देऊन राजवैद्य यांना आपली ओळख करून दिली. यावेळी अमोल व्यवहारे यांनी, "चंदूभाऊंचा शिवसैनिक म्हणून माझी परिसरात ओळख आहे. परिसरात तुम्ही माहिती घ्या. तुम्ही कालभैरव भक्त आहात, मी पण कालभैरव भक्त आहे. निश्चिंत राहा. सध्या पावसात येऊ नका; उद्या या आणि तुमचा मोबाईल घेऊन जा," असे सांगत राजवैद्य यांना धीर दिला.

तरसोद बोगद्यातील पाणी साचण्याच्या समस्येवर १५ दिवसांची डेडलाईन!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी: नशिराबादजवळील तरसोद बोगदा परिसरात पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या गंभीर समस्येवर अखेर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. नगरपरिषदेचे प्रभारी नगराध्यक्ष पंकज महाजन यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्यासह जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रश्नावर उच्चस्तरीय चर्चा केली. तरसोद बोगद्यात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने दरवर्षी नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. बोगद्यात पाणी साचल्यामुळे वाहतुकीवर परिणाम होण्यासोबतच नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी सातत्याने होत आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चेनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेला तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश देत १५ दिवसांच्या आत या समस्येवर कायमस्वरूपी मार्ग काढण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत. दरम्यान, प्रशासनाकडून दिलेली १५ दिवसांची मुदत संपल्यानंतरही प्रश्न मार्गी लागला नाही, तर नशिराबाद नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक तीव्र आंदोलन छेडतील, असा स्पष्ट इशारा प्रभारी नगराध्यक्ष पंकज महाजन यांनी दिला आहे. बैठकीदरम्यान प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या कामात काही तांत्रिक अडचणी असल्याचे निदर्शनास आणून दिले. मात्र, शहराच्या विकासात कोणत्याही प्रकारचा अडथळा सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका महाजन यांनी मांडली. समस्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करताना नगरपरिषद प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. आता प्रशासनाने दिलेल्या १५ दिवसांच्या डेडलाईनमध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात होते का आणि तरसोद बोगद्यातील पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघतो का, याकडे नशिराबादकरांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने दिलेली मुदत केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष कार्यवाहीत उतरावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नशिराबादजवळील तरसोद बोगदा परिसरात पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या गंभीर समस्येवर अखेर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. नगरपरिषदेचे प्रभारी नगराध्यक्ष पंकज महाजन यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्यासह जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रश्नावर उच्चस्तरीय चर्चा केली.



स्वराज्य ग्रुपच्या लाडक्या गणरायाचे जल्लोषात आगमन!

खंडेरावाच्या अवतारातील १५ फुटी गणरायाने वेधले सर्वांचे लक्ष

जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी: ढोल-ताशांचा गजर, गणरायाच्या जयघोषाने दुमदुमलेला परिसर आणि भक्तिमय वातावरण अशा उत्साहपूर्ण वातावरणात स्वराज्य ग्रुपच्या लाडक्या गणरायाचे धुळे शहरात जल्लोषात आगमन झाले. यंदा नंदुरबार येथून आणण्यात आलेल्या तब्बल १५ फुटी खंडेरावाच्या अवतारातील गणरायाच्या आकर्षक मूर्तीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. गणेशोत्सवाला अद्याप दोन दिवसांचा अवकाश असतानाच स्वराज्य ग्रुपच्या वतीने बाप्पाचे आगमन करण्यात आले.

सायंकाळच्या सुमारास शिवतीर्थ परिसरात महाआरती करून गणरायाच्या मिरवणुकीला सुरुवात झाली. शिवतीर्थाहून निघालेली ही भव्य मिरवणूक साक्री रोडमार्गे पुढे जात महिंदळे शिवारा परिसरात उत्साहात संपन्न झाली. मिरवणुकीदरम्यान गणेशभक्तांनी 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया' अशा जयघोषांनी परिसर दणाणून सोडला.



आकर्षक गणेशमूर्ती, शिस्तबद्ध मिरवणूक आणि गणरायाच्या भक्तिगीतांमुळे संपूर्ण परिसरात उत्साह आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. २५ वर्षांची परंपरा कायम साक्री रोड परिसरातील स्वराज्य ग्रुप गेल्या २५ वर्षांपासून मोठ्या थाटामाटात गणरायाचे आगमन करत आहे. यंदाही ही परंपरा कायम ठेवत मंडळाने नंदुरबार येथून खंडेरावाच्या अवतारातील भव्य १५ फुटी गणेशमूर्ती आणली आहे. गणरायाच्या आगमन सोहळ्यासाठी परिसरातील गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

बारा दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वराज्य ग्रुपच्या वतीने विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा तब्बल १२ दिवस गणरायाचा मुक्काम असणार असून, या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती स्वराज्य ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

या आगमन सोहळ्याप्रसंगी भूषण राजपूत, विकी आढाव, विशाल पाटील, अतुल जिरे, अतुल पाटील, गणेश ढाने, ईश्वर ढाणे, रोहित मराठे, मयूर पाटील, ललित पाटील, दादू सावंत, दिनेश वाल्हे यांच्यासह स्वराज्य ग्रुपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भव्य मूर्ती, शिस्तबद्ध मिरवणूक आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्वराज्य ग्रुपच्या गणरायाचे आगमन सोहळा धुळे शहरात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

आ.चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त साहित्याचे वाटप

जन सम्राट टाईम्स

बोदवड। प्रतिनिधी: मुक्ताई विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बोदवड येथील आत्मसन्मान फाउंडेशनमध्ये विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता, आत्मसन्मान फाउंडेशन, मुक्ताई मंगल कार्यालयाच्या मागे, बोदवड येथे सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



यावेळी मनोरुग्णांना मिष्टान्नाचे वाटप करण्यात येणार असून, पुरुषांना टी-शर्ट तर महिलांना कपड्यांचे वाटप करण्यात येणार आहे. आमदार चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

शिरपूरमध्ये पावसाचा तडाखा; व्यापारी संकुलात पाणी घुसल्याने मोठे नुकसान



जन सम्राट टाईम्स

शिरपूर, धुळे| प्रतिनिधी: तब्बल सव्वा महिन्याच्या विश्रांतीनंतर शिरपूर तालुक्यात पावसाने जोरदार पुनरागमन करत शहराला अक्षरशः झोडपून काढले. सकाळपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये सर्वत्र पाणीच पाणी झाले. प्रमुख रस्त्यांना नदी-नाल्याचे स्वरूप आले असून, जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. शिरपूर शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या करवंद नाका परिसरातील व्यापारी संकुलात रस्त्यावरील पाणी मोठ्या प्रमाणात घुसल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. दुकानांमध्ये कमरेएवढे पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांना मोठी कसरत करावी लागली. अनेक व्यापारी पाण्यातून साहित्य बाहेर काढताना दिसून आले. याच परिसरात गणेशोत्सवासाठी ठेवण्यात आलेल्या गणरायाच्या काही मूर्तीही पाण्यात भिजल्याने भाविकांसह मूर्तिकारांचे मोठे नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या पाण्यामुळे व्यापाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. दरम्यान, शिरपूर नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून व्यापारी संकुलातील साचलेले पाणी बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले. प्रशासनाच्या पथकांकडून पाण्याचा निचरा करण्याचे काम सुरू होते. सुमारे चार ते पाच तास झालेल्या जोरदार पावसामुळे शहरातील अनेक सखल भागांमध्ये गुडघ्याएवढे पाणी साचले होते. त्यामुळे वाहनधारक आणि नागरिकांना पाण्यातूनच मार्ग काढत जावे लागत होते. अनेक भागांतील घरांमध्येही पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. दीर्घ विश्रांतीनंतर झालेल्या या मुसळधार पावसाने शिरपूर शहराच्या पाणी निचरा व्यवस्थेचीही परीक्षा घेतली. व्यापारी, नागरिक आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला असून, पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत मिळावी, अशी मागणी होत आहे.

कर्जत-CSMT लोकल ठरली मैत्रीच्या पार्टीची लोकल!

धावत्या लोकलमध्ये समोसा स्नेहभोजन; रुपेश पवार यांच्याकडून बदलापूर मित्रपरिवाराला अनोखी मेजवानी

जन सम्राट टाईम्स

बदलापूर/मुंबई । प्रतिनिधी लाईफलाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या कर्जत-CSMT लोकलमध्ये शुक्रवारी रोजच्या धावपळीच्या प्रवासाला मैत्रीच्या आनंदाची अविस्मरणीय जोड मिळाली. बदलापूरच्या मित्रपरिवाराने चक्क धावत्या लोकलमध्येच समोसा पार्टी साजरी करत प्रवासाचा आनंद द्विगुणित केला. मोबाईलवर गणपतीची भक्तिगीते, हातात गरमागरम समोसा आणि मित्रांच्या गप्पा, अशा आनंदी वातावरणामुळे संपूर्ण प्रवास संस्मरणीय ठरला. या अनोख्या उपक्रमाची संकल्पना ग्रुपचे सक्रिय सदस्य तथा पत्रकार विजयकुमार पाटील यांची होती. रोजच्या कामानिमित्त कर्जत-CSMT लोकलने प्रवास करणाऱ्या मित्रांचा हा समूह गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होत आला आहे. या मैत्रीला आणखी एक सुंदर आठवण जोडावी, या उद्देशाने लोकलमध्ये स्नेहभोजनाचा विचार पुढे आला. या संकल्पनेला प्रतिसाद देत बदलापूरचे सुपरिचित आणि दिलदार व्यक्तिमत्त्व रुपेश पवार यांनी सर्व मित्रांसाठी समोसा, चटणी आणि पाण्याची व्यवस्था केली. लोकल कर्जतहून मार्गस्थ झाल्यानंतर बदलापूर स्थानकाजवळ पोहोचताच समोस्याचा सुगंध दरवळला आणि मित्रांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. त्यातच गणपतीची गाणी सुरू असल्याने प्रवासाला भक्तिमय वातावरणाचीही जोड मिळाली. "लोकलने आम्हाला केवळ मुंबईत नेले नाही, तर एकमेकांशी जोडले आहे. रोजचा प्रवास कंटाळवाणा न वाटता आनंददायी व्हावा आणि मित्रमैत्रिणींमध्ये आपुलकी कायम राहावी, यासाठी हा छोटासा प्रयत्न होता," असे पत्रकार विजयकुमार पाटील यांनी सांगितले. या मैत्रीच्या स्नेहभोजनात पत्रकार विजयकुमार पाटील, सुनील, पंकज, राजू भाई, मेडिकल, मधुबन, यश, निखिल, सर्वांचे लाडके मामा, 'A.C.', बदलापूरचे 'नाना पाटेकर' म्हणून परिचित खोपकर, विवेक, माने आदी सदस्य सहभागी झाले. मात्र, सर्वांचा लाडका विशाल यावेळी गैरहजर होता. धावत्या लोकलमध्ये काही क्षणांसाठी का होईना, रोजच्या कामाचा ताण बाजूला ठेवून मित्रांनी हास्य-विनोद, गप्पा आणि स्नेहभोजनाचा आनंद घेतला. मैत्रीला मोठ्या सोहळ्याची गरज नसते; छोट्या उपक्रमातूनही मोठा आनंद निर्माण करता येतो, याचा सुंदर अनुभव या समोसा पार्टीने दिला. मुंबईची लाईफलाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या कर्जत-CSMT लोकलमध्ये शुक्रवारी रोजच्या धावपळीच्या प्रवासाला मैत्रीच्या आनंदाची अविस्मरणीय जोड मिळाली. बदलापूरच्या मित्रपरिवाराने चक्क धावत्या लोकलमध्येच समोसा पार्टी साजरी करत प्रवासाचा आनंद द्विगुणित केला. मोबाईलवर गणपतीची भक्तिगीते, हातात गरमागरम समोसा आणि मित्रांच्या गप्पा, अशा आनंदी वातावरणामुळे संपूर्ण प्रवास संस्मरणीय ठरला.



Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

गणेशोत्सवाची चाहूल लागताच मुंबई सजली!

बाप्पांच्या आगमनाआधीच भक्तीचा उत्साह ; शिगेलामूर्ती कार्यशाळांपासून मंडपांच्या तयारीपर्यंत सर्वत्र लगबग

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: गणेशोत्सवाला अद्याप अधिकृत सुरुवात झालेली नसली, तरी मुंबईच्या वातावरणात मात्र लाडक्या बाप्पांच्या आगमनाची चाहूल स्पष्टपणे जाणवू लागली आहे. सोमवारपासून मुंबईत गणरायांचे आगमन होणार असून, त्याआधीच संपूर्ण शहर गणेशोत्सवाच्या तयारीत रंगून गेले आहे. रोजच्या धावपळीने ओळखली जाणारी मुंबई आज मात्र उत्साह, भक्ती आणि आपलेपणाने भारलेली दिसत आहे. सकाळपासून मुंबईच्या रस्त्यांवर वेगळीच लगबग पाहायला मिळत आहे. कुठे घरगुती गणपतींच्या मूर्ती घरी पोहोचवण्याची तयारी सुरू आहे, तर कुठे सार्वजनिक गणेश मंडळांच्या बाप्पांसाठी वाहने सजवली जात आहेत. काही ठिकाणी आकर्षक फुलांच्या माळा तयार होत आहेत, तर काही भागांत ढोल-ताशांच्या पथकांची सरावासाठी लगबग सुरू आहे. जणू संपूर्ण मुंबई आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज होत आहे. मूर्ती कार्यशाळेत बाप्पांची विविध रूपे या सगळ्या तयारीत सर्वाधिक लक्ष वेधून घेणारे दृश्य म्हणजे गणेशमूर्ती तयार करणाऱ्या कार्यशाळांचे. एका कार्यशाळेत बाप्पाची विविध रूपे पाहायला मिळतात. काही मूर्तींना अंतिम आकार देण्याचे काम सुरू आहे, तर काहींची रंगरंगोटी पूर्ण झाली आहे. कुठे मुकुट बसवला जात आहे, तर कुठे गणरायांच्या डोळ्यांना अंतिम रूप दिले जात आहे. कलाकारांचे हात मात्र क्षणभरही थांबत नाहीत. त्यांच्या हातातून साकार होणारी मूर्ती काही तासांत किंवा काही दिवसांत एखाद्या कुटुंबाच्या श्रद्धेचे केंद्र बनणार आहे. आज कार्यशाळेत अपूर्ण असलेली मूर्ती सोमवारनंतर एखाद्या घरातील आनंद, भक्ती आणि



भावविश्वाचा अविभाज्य भाग होणार आहे. हा विचार मनाला भावूक करून जातो. कारण गणेशोत्सवाची खरी सुरुवात कदाचित बाप्पा घरी विराजमान झाल्यानंतर नव्हे, तर त्यांच्या आगमनाच्या प्रतीक्षेपासूनच होत असावी. मुंबईच्या रस्त्यांवर भक्तीची अनेक रूपे आज कुणी छोटासा गणपती अत्यंत काळजीपूर्वक घरी घेऊन जाताना दिसतो, तर कुणी मोठ्या गणरायांच्या आगमनाची व्यवस्था करण्यात व्यस्त आहे. मुलांच्या चेहऱ्यावर उत्सुकता आहे, तर मोठ्यांच्या चेहऱ्यावर बाप्पांच्या आगमनाचा आनंद आणि आपलेपणा दिसतो. अजून ढोल-ताशांचा पूर्ण निनाद सुरू झालेला नाही. आरतीचे सूर सर्वत्र घुमू लागलेले नाहीत. मंडपांमध्ये गर्दीही वाढलेली नाही. विसर्जनाचा क्षण तर अजून दूर आहे. तरीही मुंबईच्या मनाला गणरायांच्या पावलांची चाहूल लागली आहे. रोजच्या कामाच्या, जबाबदाऱ्यांच्या आणि धावपळीच्या आयुष्यात अनेकदा सण केवळ कॅलेंडरवरील एका तारखेपुरते मर्यादित होतात. मात्र, गणेशोत्सव हा त्याला अपवाद आहे. या उत्सवाची सुरुवात बाप्पांच्या आगमनापूर्वीच होते — सुंदर प्रतीक्षेपासून, तयारीपासून आणि मनातील भक्तीपासून. आज मुंबईच्या कार्यालयातही गजाननाचे दर्शन झाले. बाहेर संपूर्ण मुंबई आपल्या बाप्पांच्या स्वागतासाठी सज्ज होत असताना, कार्यालयातही गणराय विराजमान होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळेच कदाचित आजची मुंबई नेहमीपेक्षा काहीशी वेगळी भासत आहे. आगमनाला अजून अवकाश असला, तरी मुंबईने मनोमन घोषणा करून टाकली आहे. गणेशोत्सवाला अद्याप अधिकृत सुरुवात झालेली नसली, तरी मुंबईच्या वातावरणात मात्र लाडक्या बाप्पांच्या आगमनाची चाहूल स्पष्टपणे जाणवू लागली आहे. सोमवारपासून मुंबईत गणरायांचे आगमन होणार असून, त्याआधीच संपूर्ण शहर गणेशोत्सवाच्या तयारीत रंगून गेले आहे. रोजच्या धावपळीने ओळखली जाणारी मुंबई आज मात्र उत्साह, भक्ती आणि आपलेपणाने भारलेली दिसत आहे. सकाळपासून मुंबईच्या रस्त्यांवर वेगळीच लगबग पाहायला मिळत आहे. कुठे घरगुती गणपतींच्या मूर्ती घरी पोहोचवण्याची तयारी सुरू आहे, तर कुठे सार्वजनिक गणेश मंडळांच्या बाप्पांसाठी वाहने सजवली जात आहेत. काही ठिकाणी आकर्षक फुलांच्या माळा तयार होत आहेत, तर काही भागांत ढोल-ताशांच्या पथकांची सरावासाठी लगबग सुरू आहे. जणू संपूर्ण मुंबई आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज होत आहे. मूर्ती कार्यशाळेत बाप्पांची विविध रूपे या सगळ्या तयारीत सर्वाधिक लक्ष वेधून घेणारे दृश्य म्हणजे गणेशमूर्ती तयार करणाऱ्या कार्यशाळांचे. एका कार्यशाळेत बाप्पाची विविध रूपे पाहायला मिळतात. काही मूर्तींना अंतिम आकार देण्याचे काम सुरू आहे, तर काहींची रंगरंगोटी पूर्ण झाली आहे. कुठे मुकुट बसवला जात आहे, तर कुठे गणरायांच्या डोळ्यांना अंतिम रूप दिले जात आहे. कलाकारांचे हात मात्र क्षणभरही थांबत नाहीत. त्यांच्या हातातून साकार होणारी मूर्ती काही तासांत किंवा काही दिवसांत एखाद्या कुटुंबाच्या श्रद्धेचे केंद्र बनणार आहे. आज कार्यशाळेत अपूर्ण असलेली मूर्ती सोमवारनंतर एखाद्या घरातील आनंद, भक्ती आणि भावविश्वाचा अविभाज्य भाग होणार आहे. हा विचार मनाला भावूक करून जातो. कारण गणेशोत्सवाची खरी सुरुवात कदाचित बाप्पा घरी विराजमान झाल्यानंतर नव्हे, तर त्यांच्या आगमनाच्या प्रतीक्षेपासूनच होत असावी.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

सारोळा शाळेत माता-पालक शैक्षणिक मेळावा उत्साहात संपन्न



जन सम्राट टाईम्स

जामखेड| प्रतिनिधी : शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा, केंद्र राजुरी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर येथे माता-पालक शैक्षणिक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. याच उद्देशाने शाळेतील शिक्षकांनी उपस्थित माता-भगिनींशी विविध शैक्षणिक व सामाजिक विषयांवर संवाद साधत मार्गदर्शन केले. मेळाव्यात 'निपुण महाराष्ट्र' व 'निपुण भारत' उपक्रमांमध्ये पालकांची भूमिका, शालेय स्पर्धा परीक्षा, शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, विविध शासकीय योजनांची माहिती, बालआहार, बालसंरक्षण व बालहक्क आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पालकांनी दररोज किमान २० मिनिटे आपल्या मुलांसोबत संवाद साधण्याचे महत्त्वही शिक्षकांनी पटवून दिले. यावेळी विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील प्रगती, त्यांना येणाऱ्या अडचणी तसेच त्यावरील उपाययोजनांबाबत माता-पालकांनी संबंधित वर्गशिक्षकांशी वैयक्तिक संवाद साधून चर्चा केली. मेळाव्याच्या सांगता प्रसंगी शाळेतर्फे पूरक आहार म्हणून शेंगदाणा-बदाम चक्की तसेच भाजीपालायुक्त पौष्टिक वाटाणा मसालेभात देण्यात आला. उपस्थितांनी या पौष्टिक मेजवानीचा आनंद घेतला. यावेळी ग्रेड मुख्याध्यापक संदिप भालसिंग, उपाध्यापिका शबाना शेख, वृषाली खांदवे, अमृता रसाळ, पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे, राहुल लिमकर तसेच उपाध्यापक प्रशांत होळकर यांच्यासह मोठ्या संख्येने माता-भगिनी उपस्थित होत्या. माता-पालकांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मातांनी व्यक्त केलेली सकारात्मक भूमिका यामुळे हा माता-पालक शैक्षणिक मेळावा अत्यंत उपयुक्त व संस्मरणीय ठरला. शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा, केंद्र राजुरी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर येथे माता-पालक शैक्षणिक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.म भारत' उपक्रमांमध्ये पालकांची भूमिका, शालेय स्पर्धा परीक्षा, शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, विविध शासकीय योजनांची माहिती, बालआहार, बालसंरक्षण व बालहक्क आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

निकिता पाटील यांना निमजाई फाउंडेशनतर्फे पालकमंत्र्यांच्या हस्ते शिलाई मशीन!

कौशल्याच्या माध्यमातून स्वावलंबी होण्यासाठी मदतीचा हात

जन सम्राट टाईम्स

पाळधी। प्रतिनिधी: जगात अनेकांच्या वाट्याला विविध प्रकारचे दुःख येते; मात्र आपल्या आयुष्यात जे नाही त्याची खंत करण्यापेक्षा आपल्यातील कला, कौशल्य आणि क्षमतांचा उपयोग करून सकारात्मक बदल घडवून आणणे गरजेचे आहे. कौशल्य विकासाच्या क्षेत्रात अग्रगण्य कार्य करणाऱ्या निमजाई फाउंडेशन आणि सामाजिक सेवाभावी कार्यात सक्रिय असलेल्या मुक्ती फाउंडेशन यांच्या वतीने पाळधी येथील होतकरू व स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या दिव्यांग सौ. निकिता समाधान पाटील यांना मदतीचा हात देण्यात आला. राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री ना. भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील यांच्या शुभहस्ते निकिता पाटील यांना नुकतीच शिलाई मशीन तसेच मशीनचा संपूर्ण सेट प्रदान करण्यात आला.



या मदतीमुळे त्यांना शिवणकामाच्या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध होऊन स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. दिव्यांगत्वावर मात करत स्वतःच्या हिमतीवर पुढे जाण्याची धडपड करणाऱ्या निकिता पाटील यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी फाउंडेशनने हा उपक्रम राबविला. समाजातील गरजू व होतकरू व्यक्तींना कौशल्याच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहेत. यावेळी पालकमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक नवलसिंग राजे पाटील, अभिजीत पाटील, निमजाई फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. शीतलताई पाटील, भूषण राक्षे, मुक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष मुकुंद गोसावी, किशोर पाटील, वैभव निकुंभ, महेश पाटील आदी उपस्थित होते. निकिता पाटील यांना मिळालेल्या या मदतीमुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी नवी दिशा मिळाली असून, निमजाई फाउंडेशन व मुक्ती फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. जगात अनेकांच्या वाट्याला विविध प्रकारचे दुःख येते; मात्र आपल्या आयुष्यात जे नाही त्याची खंत करण्यापेक्षा आपल्यातील कला, कौशल्य आणि क्षमतांचा उपयोग करून सकारात्मक बदल घडवून आणणे गरजेचे आहे. कौशल्य विकासाच्या क्षेत्रात अग्रगण्य कार्य करणाऱ्या निमजाई फाउंडेशन आणि सामाजिक सेवाभावी कार्यात सक्रिय असलेल्या मुक्ती फाउंडेशन यांच्या वतीने पाळधी येथील होतकरू व स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या दिव्यांग सौ. निकिता समाधान पाटील यांना मदतीचा हात देण्यात आला.

कावपिंप्री येथे विद्यार्थिनीची आत्महत्या !

शिक्षक दिनी शाळेत शिक्षिकेची भुमिका पार पाडली होती !

जन सम्राट टाईम्स

पारोळा । (प्रतिनिधी): अंमळनेर तालुक्यातील कावपिंप्री येथील दहावीच्या विद्यार्थिनी अनुष्का रवींद्र सपकाळे हिच्या आत्महत्येप्रकरणी दोघा भाऊ-बहीणीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बळजबरीने प्रेमसंबंध ठेवण्याचा तगादा लावून मानसिक त्रास दिल्यामुळे अनुष्काने आत्महत्या केल्याचे पोलिसांत दाखल फिर्यादीतून समोर आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, कावपिंप्री येथील माध्यमिक शाळेत दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुष्का रवींद्र सपकाळे हिने ५ सप्टेंबर रोजी दुपारी राहत्या घरी साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. विशेष म्हणजे, त्याच दिवशी सकाळी शाळेत झालेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात तिने शिक्षिकेची भूमिका साकारली होती. या प्रकरणी मयत अनुष्काची आजी शोभाबाई बळीराम सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सुमारे एक महिन्यापूर्वी अनुष्काने आजीला सांगितले होते की, त्यांच्या घरामागे राहणारा स्वप्नील जयवंतराव



पवार (मूळ रा. चौगाव, ता. चोपडा, ह. मु. कावपिंप्री) हा तिला 'तू मला आवडतेस, तू माझ्याशी प्रेमसंबंध ठेव' असे म्हणत त्रास देत होता. तसेच त्याची बहीण रुपाली आनंद अहिरे हीदेखील अनुष्कावर स्वप्नीलसोबत प्रेमसंबंध ठेवण्यासाठी बळजबरी करत होती.

याबाबत अनुष्काने आजीला सांगितले होते की, या दोघांना समजावून सांगा; अन्यथा मी स्वतःचे काहीतरी करून घेईन. त्यानंतर आजी शोभाबाई बळीराम सोनवणे यांनी स्वप्नील जयवंतराव पवार व रुपाली आनंद अहिरे यांना अनुष्का लहान आहे, तिला मानसिक त्रास देऊ नका, असे सांगितले होते. मात्र, त्यानंतरही दोघांकडून अनुष्काला त्रास देणे सुरूच होते. तसेच त्यांनी आजीलाही शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. ५ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजता शोभाबाई भरवस येथे अंत्ययात्रेसाठी गेल्या होत्या. त्यावेळी अनुष्काने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवले. त्यानंतर काही लोकांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याच दिवशी दुपारी दीड वाजेच्या सुमारास स्वप्नील अनुष्काच्या घरात घुसला होता, तर रुपाली अहिरे अनुष्काला शिवीगाळ करत होती.

या प्रकारामुळे अनुष्काला दोघांकडून त्रास दिला जात असल्याचे स्पष्ट झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. शोभाबाई बळीराम सोनवणे यांच्या फिर्यादीवरून स्वप्नील जयवंतराव पवार आणि रुपाली आनंद अहिरे या भाऊ-बहीणीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम १०८, ३५१ (२) आणि ३५२ अन्वये आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे करीत आहेत.

महाभारताची जिवंत साक्ष देणाऱ्या ऋषींसमवेत गणरायाच्या मूर्तीने वेधले धुळेकरांचे लक्ष

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: महाभारताच्या इतिहासाची जिवंत साक्ष देणाऱ्या ऋषींसमवेत साकारलेल्या गणरायाच्या आगळ्यावेगळ्या मूर्तीने धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले. नेताजी ग्राउंड सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या वतीने यंदा पंधरा फुटी गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात येणार असून, त्याचा आगमन सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. आग्रा रोडवरून ढोल-ताशांच्या गजरात आणि डीजेच्या तालावर गणरायाची



भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी धुळ्याचे माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, 'बेटी बचाव, बेटी पढाव'च्या संयोजिका अल्पा अग्रवाल तसेच जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे यांनी उपस्थिती लावत मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले. आग्रा रोडवरून निघालेली ही मिरवणूक नेताजी ग्राउंड येथे पोहोचून संपन्न झाली. गेल्या तीन वर्षांपासून नेताजी ग्राउंड सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या वतीने गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.

यंदा मंडळाने महाभारताचा इतिहास अधोरेखित करणारी गणरायाची विशेष मूर्ती साकारली आहे. ऋषींसमवेत असलेल्या या आकर्षक मूर्तीने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक कोंडी होऊ नये आणि प्रशासनाला सहकार्य मिळावे, या उद्देशाने मंडळाने यंदा गणरायाचे आगमन दोन दिवस आधीच करण्याचा निर्णय घेतला. एकसारखा पोशाख परिधान केलेले कार्यकर्ते, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि पंधरा फुटी आकर्षक गणरायामुळे आगमन सोहळ्याला विशेष रंगत आली. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात आपल्या लाडक्या गणरायाचे स्वागत केले. आगळ्यावेगळ्या संकल्पनेमुळे यंदाचा गणेशोत्सव धुळेकरांसाठी विशेष आकर्षणाचा ठरणार असल्याचे चित्र आहे.

धरणगाव उपनगराध्यक्षपदी रुपाली महाजन यांची बिनविरोध निवड

शिवसेनेच्या रूपालीताई पवन महाजन देवरे यांच्यावर उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी रूपालीताई पवन महाजन देवरे यांची दि. ११ सप्टेंबर रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे शिवसेना तसेच महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रूपाली महाजन या धरणगाव येथील शिवसेनेचे माजी उपनगराध्यक्ष, श्री व्यायाम प्रसारक मंडळाचे संचालक तसेच माळी समाजाचे पदाधिकारी देविदास बापू महाजन यांच्या सुनबाई असून, उद्योगपती पवन भाऊ महाजन यांच्या पत्नी आहेत. उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर विविध



मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी रूपाली महाजन यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री आणि शिवसेनेचे नेते गुलाबराव पाटील, जळगाव जिल्हा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, अखिल भारतीय मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष व माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील सर, राष्ट्रीय चर्मकार समाजाचे नेते भानुदास विसावे, शिवसेनेचे युवा नेते प्रतापराव पाटील, मोठा माळीवाडा समाजाचे संचालक विजय भाऊ महाजन, माजी गटनेते पप्पू भाऊ भावे, नगरपालिकेचे गटनेते विलास भाऊ महाजन, धरणगाव शहर शिवसेना शहरप्रमुख धीरेन आप्पा पूर्भे यांच्यासह शिवसेना, युवासेना, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी गायकवाड साहेब, मुख्याधिकारी रोशन कुमार राजपूत तसेच कार्यालयीन अधिकारी भिकन पारधी साहेब उपस्थित होते. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उपस्थित मान्यवर व अधिकाऱ्यांनी नवनियुक्त उपनगराध्यक्ष रूपाली महाजन यांचे स्वागत व सत्कार करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

शहराच्या विकासासाठी मिळालेली ही जबाबदारी सक्षमपणे पार पाडत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी रूपालीताई पवन महाजन देवरे यांची दि. ११ सप्टेंबर रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे शिवसेना तसेच महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रूपाली महाजन या धरणगाव येथील शिवसेनेचे माजी उपनगराध्यक्ष, संचालक तसेच माळी समाजाचे पदाधिकारी देविदास बापू महाजन यांच्या सुनबाई असून, उद्योगपती पवन भाऊ महाजन यांच्या पत्नी आहेत. उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी रूपाली महाजन यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

'तिशीचा पल्ला, तपासणी आणि सल्ला' मोहिमेविषयी कार्यशाळा!

जन सम्राट टाईम्स

भडगाव| प्रतिनिधी: भडगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली 'तिशीचा पल्ला, तपासणी आणि सल्ला' या मोहिमेविषयी कार्यशाळा नुकतीच पार पडली. यावेळी डॉ. वाघ यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोहिमेची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी माहिती देताना डॉ. वाघ यांनी सांगितले की, Non-Communicable Diseases (NCD) अर्थात असंसर्गजन्य आजारांबाबत सर्वेक्षण करून नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत ३० वर्षे व त्यावरील सर्व नागरिकांची नोंदणी करण्यात येणार असून, मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा तसेच कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांची तपासणी केली जाणार आहे. ही मोहीम १ सप्टेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. असंसर्गजन्य आजारांची लक्षणे असलेल्या रुग्णांचा शोध घेणे, त्यांची आवश्यक तपासणी करणे तसेच त्यांना योग्य सल्ला व उपचार मिळवून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करून ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन डॉ. समाधान वाघ यांनी कार्यशाळेच्या प्रसंगी केले. या कार्यशाळेस भडगाव तालुक्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पेणच्या 15 लाख गणेशमूर्ती यंदा विदेशात; अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, यूएईसह विविध देशांत वाढली मागणी!

सुरक्षित पॅकिंगपासून वाहतुकीपर्यंत कारागिरांची विशेष काळजी

जन सम्राट टाईम्स

पेण । प्रतिनिधी: गणपतीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पेणमध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लगबग वाढली आहे. पेणमध्ये साकारलेल्या रेखीव, आकर्षक आणि कलात्मक गणेशमूर्तींना देशभरातूनच नव्हे, तर विदेशातूनही मोठी मागणी आहे. यंदा सुमारे १५ लाख गणेशमूर्ती परदेशात रवाना झाल्याची माहिती आहे. त्यामुळे पेणच्या गणेशमूर्तींनी पुन्हा एकदा जागतिक बाजारपेठेत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पेणच्या गणेशमूर्तींचे बोलके डोळे, सुबक मुखाकृती, आकर्षक रंगसंगती आणि कलात्मकता यामुळे जगभरातील गणेशभक्त त्यांना पसंती देतात. अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, संयुक्त अरब अमिरातीसह विविध देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीयांकडून तसेच स्थानिक गणेश मंडळांकडून पेणच्या मूर्तींना मोठी मागणी आहे. महिने आधीपासून नियोजन परदेशात गणेशमूर्ती पाठविण्याचे नियोजन अनेक महिने आधीपासून केले जाते.

मोठ्या संख्येने मूर्ती समुद्रमार्गे कंटेनरमधून, तर तातडीच्या मागणीनुसार काही मूर्ती हवाईमार्गाने पाठविल्या जातात. प्रवासादरम्यान मूर्तींचे नुकसान होऊ नये, यासाठी पॅकिंग करताना विशेष काळजी घेतली जाते. मूर्तींची सुरक्षितता, आकारमान आणि वाहतुकीदरम्यान होणारे संभाव्य नुकसान लक्षात घेऊन त्यांची काळजीपूर्वक बांधणी केली जाते. ७० लाखांहून अधिक मूर्तींची विक्री



पेणमधील गणेशमूर्ती उद्योगाला यंदा चांगलीच चालना मिळाली आहे. उपलब्ध माहितीनुसार, पेणमध्ये ७० लाखांहून अधिक गणेशमूर्तींची विक्री झाली आहे.

कच्च्या मालाच्या वाढलेल्या दरामुळे मूर्तींच्या किमतीत सुमारे १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली असली, तरी भक्तांची मागणी कायम आहे. या उद्योगातून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल होत असून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळत आहे. हिलांचा वाढता सहभाग पेणच्या गणेशमूर्ती उद्योगात महिलांचा सहभागही लक्षणीयरीत्या वाढला आहे. मूर्ती साकारण्यापासून रंगकाम, डोळ्यांची आखणी, कलाकुसर आणि वस्त्रालंकारापर्यंत विविध कामांमध्ये महिला कौशल्याने योगदान देत आहेत. त्यामुळे या पारंपरिक उद्योगातून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होत असून, अनेक कुटुंबांच्या अर्थकारणाला हातभार लागत आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची हाक दरम्यान, गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा संदेश देण्यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स' आणि 'महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने 'टाइम्स ग्रीन गणेश' उपक्रमांतर्गत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. वांद्रे-कुर्ला संकुलातील इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कार्यालयात झालेल्या या कार्यशाळेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

एकीकडे पेणच्या पारंपरिक गणेशमूर्ती जगभरातील गणेशभक्तांपर्यंत पोहोचत असताना, दुसरीकडे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची चळवळही वेग घेत आहे.

त्यामुळे पेणच्या बाप्पांच्या कलात्मक परंपरेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दूरवर पोहोचत आहे. गणपतीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पेणमध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लगबग वाढली आहे. पेणमध्ये साकारलेल्या रेखीव, आकर्षक आणि कलात्मक गणेशमूर्तींना देशभरातूनच नव्हे, तर विदेशातूनही मोठी मागणी आहे. यंदा सुमारे १५ लाख गणेशमूर्ती परदेशात रवाना झाल्याची माहिती आहे. त्यामुळे पेणच्या गणेशमूर्तींनी पुन्हा एकदा जागतिक बाजारपेठेत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

पळासखेडे बु. खून प्रकरणातील संशयिताला जंगलातून अटक!

जन सम्राट टाईम्स



पारोळा। प्रतिनिधी: पळासखेडे बुद्रुक, ता. पारोळा येथे पोळा सणाच्या दिवशी झालेल्या १८ वर्षीय शालेय विद्यार्थी मयूर दुर्वास पाटील याच्या खून प्रकरणातील फरार संशयिताला पारोळा पोलिसांनी अखेर अटक केली आहे. अंकुश नेहरू पाटील (वय ३०, रा. पळासखेडे बुद्रुक) याला तालुक्यातील राजवड येथील घनदाट जंगलातून पहाटे सुमारे तीन वाजता पोलिस पथकाने ताब्यात घेतले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोळा सणाच्या दिवशी गुरुवारी दुपारी तीन ते चार वाजेच्या सुमारास मागील भांडणाच्या कारणावरून मयूर पाटील याच्यावर संशयित अंकुश पाटील याने चाकूने वार केला. या हल्ल्यात मयूर गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

घटनेनंतर संशयित अंकुश पाटील हा घटनास्थळावरून फरार झाला होता. त्याला तातडीने अटक करण्यात यावी, या मागणीसाठी पळासखेडे बुद्रुक येथील संतप्त ग्रामस्थांनी पारोळा पोलिस ठाण्याच्या आवारात मोठी गर्दी केली होती. दरम्यान, ११ रोजी मयूर पाटील याच्यावर पळासखेडे बुद्रुक येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिसांचे पथक जंगलात रवाना फरार संशयिताचा शोध घेण्यासाठी पोलिस उपअधीक्षक विनायक कोते व पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक योगेश महाजन व पोलिस उपनिरीक्षक विजय भोंबे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथक रवाना करण्यात आले होते. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिस पथकाने राजवड परिसरातील घनदाट जंगलात शोधमोहीम राबवून संशयित अंकुश पाटील याला ताब्यात घेतले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

संतोष भाऊ गव्हाळे यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान

सामाजिक उपक्रमाचे तालुक्यात कौतुक



जन सम्राट टाईम्स

जामखेड | प्रतिनिधी: सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेले प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते तथा जामखेड नगरपरिषदेचे नगरसेवक संतोष भाऊ गव्हाळे यांनी आपला वाढदिवस अत्यंत अनोख्या आणि समाजोपयोगी पद्धतीने साजरा करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. खर्डा परिसरालगत भूम तालुक्यातील नळी वडगाव येथील 'श्री संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळ वृद्धाश्रमात' जाऊन संतोष गव्हाळे यांनी तेथील आजी-आजोबांसोबत केक कापत वाढदिवस साजरा केला.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांशी त्यांनी मनमोकळा संवाद साधत त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण घालवले आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता किंवा कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता, वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत वाटून घेण्याच्या उद्देशाने यावेळी भव्य अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास पत्रकार श्वेता गायकवाड, साळुंखे, समता ग्रुपचे सर्व सभासद, कार्यकर्ते तसेच संतोष गव्हाळे यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी करण्यात आलेल्या या अन्नदान उपक्रमाचे उपस्थित मान्यवर आणि नागरिकांनी भरभरून कौतुक केले. वाढदिवसानिमित्त राबविलेल्या या समाजोपयोगी उपक्रमाची सध्या जामखेड तालुक्यात चर्चा होत असून, संतोष गव्हाळे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले जात आहे. "वृद्धांचा आशीर्वाद हीच माझ्यासाठी मोठी समाधानाची गोष्ट" यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना संतोष गव्हाळे भावूक झाले. ते म्हणाले, "माझा वाढदिवस मी दरवर्षी नळी वडगाव येथील याच वृद्धाश्रमात येऊन अशाच पद्धतीने साजरा करणार आहे. या ज्येष्ठ नागरिकांचा आदर करणे आणि त्यांचा आशीर्वाद घेणे हीच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी समाधानाची गोष्ट आहे." वाढदिवसाच्या निमित्ताने आनंद साजरा करण्याची संकल्पना समाजातील गरजू आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचवून संतोष गव्हाळे यांनी समाजाला एक सकारात्मक आणि प्रेरणादायी संदेश दिला आहे.

धुळ्यात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव; नागरिकांच्या जीविताला धोका! उपाययोजना करा

अन्यथा मनपाच्या आवारातच मोकाट कुत्रे सोडणार

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: धुळे शहरातील विविध भागांत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. मोकाट कुत्र्यांच्या भीतीमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन शहरातून वावरावे लागत असल्याचा आरोप करत स्वाभिमानी क्रांती सेनेने महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. मोकाट कुत्र्यांवर तातडीने प्रभावी उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा शहरातील मोकाट कुत्रे महापालिकेच्या आवारातच सोडण्यात येतील, असा इशारा स्वाभिमानी क्रांती सेनेचे संस्थापक ॲड. संतोष जाधव यांनी मनपा प्रशासनाला दिला आहे. दरम्यान, मनपा प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन पदाधिकाऱ्यांना दिल्याचे संघटनेने सांगितले. बालकांवर हल्ल्यांच्या घटनांनी चिंता वाढली धुळे शहरातील विविध भागांत मोकाट कुत्र्यांनी नागरिकांसह बालकांवर हल्ला केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. काही घटनांमध्ये बालकांचा मृत्यू



झाल्याचा दावा संघटनेने केला आहे. या पार्श्वभूमीवर मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर मनपा प्रशासनाने कायमस्वरूपी व प्रभावी तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली आहे. मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी मनपा प्रशासनाकडून निर्बीजीकरणाची प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र, ही प्रक्रिया अपेक्षित परिणामकारक ठरली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

निर्बीजीकरणासह अँटी रेबीज लसीकरणाची मागणी स्वाभिमानी क्रांती सेनेच्या वतीने मनपा प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यामध्ये शहरातील प्रत्येक प्रभागात सर्वेक्षण करून मोकाट कुत्र्यांची संख्या निश्चित करणे, प्रभावी निर्बीजीकरण मोहीम राबविणे, अँटी रेबीज लसीकरण करणे, कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटनांची तातडीने दखल घेण्यासाठी विशेष पथक नियुक्त करणे आदी मागण्यांचा समावेश आहे. तसेच नागरिकांच्या तक्रारींसाठी २४ तास हेल्पलाइन सुरू करावी, बाजारपेठा, शाळा-महाविद्यालये, रुग्णालये, बसस्थानके तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या परिसरात विशेष मोहीम राबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. "नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड नको" नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून मनपा प्रशासनाने मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात. प्रशासनाने दखल घेतली नाही, तर शहरातील मोकाट कुत्रे महापालिकेच्या आवारात सोडण्याचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी क्रांती सेनेने दिला आहे. यावेळी स्वाभिमानी क्रांती सेनेचे संस्थापक ॲड. संतोष जाधव, धुळे जिल्हाध्यक्ष किशोर बोरसे, सुरेश बैसाणे, जितेंद्र पवार, किशोर मोरे, स्वप्निल कर्डक, अंकित शिरसाट, रघुनाथ खोपे, सुरेश अहिरे, विकास पाटील, कैलास अमृतसागर, विजय कडरे, महिला आघाडीच्या अनिता सोनवणे, सुनिता गोपाळ, नागेश्वरी साळवे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जळगाव जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस पाटील मेळावा

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३७ पोलीस पाटलांचा गौरव

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: ग्रामीण भागात पोलीस प्रशासन आणि नागरिकांमधील महत्त्वाचा दुवा म्हणून पोलीस पाटील यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारीला प्रतिबंध करणे तसेच विविध जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात पोलीस पाटलांचे योगदान उल्लेखनीय आहे. या कार्याचा गौरव करण्यासाठी जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पोलीस पाटील मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

११ सप्टेंबर २०२६ रोजी समर्थ लॉन्स, ता. जि. जळगाव येथे झालेल्या या मेळाव्यात जिल्ह्यातील पोलीस पाटलांना नवीन कायदे, कायदा व सुव्यवस्था, तसेच त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी 'पोलीस पाटील मार्गदर्शक पुस्तिकेचे' अनावरण करण्यात आले. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती



या कार्यक्रमास पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. गुलाबराव पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री मा. ना. श्री. गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री मा. ना. श्री. संजय सावकारे, जळगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. सुरेश भोळे, चाळीसगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. मंगेश चव्हाण, तसेच जिल्हाधिकारी, जळगाव आणि पोलीस अधीक्षक, जळगाव यांची प्रमुख उपस्थिती होती. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ३७ पोलीस पाटलांचा गौरव जळगाव जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ३७ पोलीस पाटलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव झाल्याने उपस्थित पोलीस पाटलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. 'विश्वासाची लेन्स' स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'विश्वासाची लेन्स' छायाचित्र व Reels स्पर्धेतील विजेत्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. पोलीस दल आणि नागरिकांमधील विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्यासोबतच पोलिसांच्या कार्याची सकारात्मक बाजू समाजासमोर आणण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्याध्यापक संघाच्या सदस्यपदी एम. एम. चौधरी सरांची बिनविरोध निवड

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: जळगाव जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या सदस्यपदी खंडाळा येथील रहिवासी तथा किन्ही येथील सर्वोदय हायस्कूलचे मुख्याध्यापक एम. एम. चौधरी सर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वोदय हायस्कूल, किन्ही येथील सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे एम. एम. चौधरी सर यांची कार्यतत्परता, शैक्षणिक बांधिलकी आणि शिक्षक व विद्यार्थ्यांप्रती असलेली सकारात्मक भूमिका यांची दखल घेत त्यांच्यावर मुख्याध्यापक संघाच्या सदस्यपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्या बिनविरोध निवडीमुळे शैक्षणिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुख्याध्यापक संघाच्या माध्यमातून शिक्षकांच्या



विविध प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे, त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविण्यास प्राधान्य देणार असल्याचा विश्वास चौधरी सर यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

त्यांच्या निवडीबद्दल सर्वोदय हायस्कूल, किन्ही येथील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाचा आणि अनुभवाचा मुख्याध्यापक संघाला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

'आनंदराज आंबेडकरांचा अवमान सहन करणार नाही'

रमेश कदम यांच्यावर कायदेशीर कारवाईची मागणी



जन सम्राट टाईम्स

मालेगाव | प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्याबाबत रमेश कदम यांनी केल्याचा आरोप असलेल्या कथित अवमानकारक वक्तव्यावरून आंबेडकरी समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या वक्तव्याचा निषेध करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून, संबंधित व्यक्तींवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. आनंदराज आंबेडकर तसेच आंबेडकर कुटुंबीयांविषयी अशा प्रकारची वक्तव्ये करणे हा आंबेडकरी समाजाच्या भावनांचा अवमान असल्याचे रिपब्लिकन सेनेने निवेदनात म्हटले आहे. संबंधित वक्तव्यामागील नेमका हेतू काय होता, याची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणीही करण्यात आली.

"आंबेडकरी समाजाच्या भावना दुखावणारी वक्तव्ये खपवून घेतली जाणार नाहीत. प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत तातडीने योग्य ती कारवाई करावी," अशी भूमिका रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली. दरम्यान, प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करण्यात आली नाही, तर रिपब्लिकन सेनेच्या वतीने महाराष्ट्रभर लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष बिपीन पटाईत, युवा जिल्हाध्यक्ष ॲड. आकाश सुरवाडे, महिला शहराध्यक्ष सौ. सारिका गायकवाड, तालुकाध्यक्ष रविंद्र ढोडरे, सम्राट निकम, मुकेश खैरनार, युवराज वाघ, किरण केदारे, सिद्धांत शिंदे, विनोद पवार, रवि यशोद, वाल्मिक त्रिभुवन, राजू वाघ, कल्पेश लोखंडे, राजेंद्र अहिरे, अक्षय अहिरे, नितीन बि-हाडे, आकाश महिरे, ॲड. स्वप्निल गायकवाड आदी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्याबाबत रमेश कदम यांनी केल्याचा आरोप असलेल्या कथित अवमानकारक वक्तव्यावरून आंबेडकरी समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या वक्तव्याचा निषेध करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून, संबंधित व्यक्तींवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बसस्थानकात सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती

OTP, PIN, पासवर्ड आणि गोपनीय माहिती शेअर न करण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत वाढणाऱ्या सायबर फसवणुकीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (KBCNMU), जळगाव आणि Quick Heal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव बसस्थानकात सायबर सिक्युरिटी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमादरम्यान बस वाहकांना सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी घ्यावयाची खबरदारी



तसेच संशयास्पद कॉल, मेसेज आणि लिंक कशा ओळखाव्यात, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्ह्याची घटना घडल्यास घाबरून न जाता तातडीने कोणती पावले उचलावीत, याचीही माहिती देण्यात आली. डिजिटल व्यवहार करताना सतर्कता आणि गोपनीयतेला सर्वाधिक महत्त्व आहे, यावर कार्यक्रमात विशेष भर देण्यात आला. OTP, PIN, पासवर्ड तसेच बँक खात्याशी संबंधित कोणतीही गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तीसोबत शेअर करू नये, असे आवाहन करण्यात आले. सायबर गुन्हेगारांकडून विविध आमिषे दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याने कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी किंवा संशयास्पद फोनवर माहिती देण्यापूर्वी योग्य ती पडताळणी करण्याचा सल्लाही यावेळी देण्यात आला. या जनजागृती उपक्रमात स्नेहल पाटील आणि वैष्णवी पाटील यांनी सक्रिय सहभाग घेत बस वाहकांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. बस वाहकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सायबर फसवणुकीचे प्रकार आणि त्यापासून बचाव करण्याच्या उपाययोजनांची माहिती जाणून घेतली. या कार्यक्रमासाठी Dr. R. B. Amale Sir यांचे मार्गदर्शन लाभले. डिजिटल युगात वाढत्या सायबर धोक्यांच्या पार्श्वभूमीवर अशा जनजागृती उपक्रमांची गरज अधिक वाढली असून, नागरिकांनीही डिजिटल व्यवहार करताना सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमादरम्यान बस वाहकांना सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी घ्यावयाची खबरदारी तसेच संशयास्पद कॉल, मेसेज आणि लिंक कशा ओळखाव्यात, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्ह्याची घटना घडल्यास घाबरून न जाता तातडीने कोणती पावले उचलावीत, याचीही माहिती देण्यात आली. डिजिटल व्यवहार करताना सतर्कता आणि गोपनीयतेला सर्वाधिक महत्त्व आहे, यावर कार्यक्रमात विशेष भर देण्यात आला. OTP, PIN, पासवर्ड तसेच बँक खात्याशी संबंधित कोणतीही गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तीसोबत शेअर करू नये, असे आवाहन करण्यात आले. सायबर गुन्हेगारांकडून विविध आमिषे दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याने कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी किंवा संशयास्पद फोनवर माहिती देण्यापूर्वी योग्य ती पडताळणी करण्याचा सल्लाही यावेळी देण्यात आला.